आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
६ मार्च २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- आगामी आर्थिक वर्षासाठी राज्याचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर / कृषी, रस्ते विकास, पर्यटन आदि क्षेत्रांसाठी विविध योजनांची घोषणा,

- शेतकऱ्यांसाठी २ लाखापर्यंतच्या कर्जमाफी योजनेची अर्थसंकल्पात घोषणा, नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांची मदत मिळणार

- तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती

- मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात येत्या दोन दिवसात उष्णतेची लाट येण्याची शक्यता

**आणि**

- टी-ट्वेंटी विश्वचषक विजेतेपदासाठी रविवारी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात सामना, संजू सॅमसन मालिकावीरांच्या संभाव्य यादीत

**<><><><><>**

राज्याला २०४७ पर्यंत विकसित करण्याचं उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून तयार केलेला अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सादर केला. यंदाचा अर्थसंकल्प हा आगामी वर्षाचा जमाखर्च नसून विकसित महाराष्ट्र २०४७ कडे जाणाऱ्या प्रवासाचा महत्त्वाचा टप्पा असल्याचं त्यांनी सांगितलं. यावेळी कृषी, रस्ते विकास, पर्यटन यासारख्या क्षेत्रासाठी त्यांनी आज विविध योजनांची घोषणा केली. तसंच विविध समाज सुधारकांच्या नावे विविध उपक्रम राबवणार असल्याचंही ते म्हणाले. यासाठी २०२६-२७ हे सामाजिक समता आणि समरसता वर्ष असेल, असं त्यांनी सांगितलं.

३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांना २ लाखापर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना त्यांनी आज जाहीर केली. नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत लाभ सरकार देणार आहे.

२०४७ पर्यंत कृषी क्षेत्राचा जीडीपी ५५ अब्जवरून ५०० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे. कृषी क्षेत्रासाठीच्या विविध योजनांविषयी ते म्हणाले.

**- - होल्ड - मुख्यमंत्री कृषी - -**

मुख्यमंत्री मत्स्य संपदा योजनेची घोषणाही त्यांनी या अर्थसंकल्पात केली. याशिवाय मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात २३ हजार किलोमीटर रस्ते तयार करण्याचं ते म्हणाले. याशिवाय महाराष्ट्र अमृतकाळ रस्ते विकास योजनेची घोषणा त्यांनी केली. यामाध्यमातून ६ हजार किलोमीटर हून अधिक लांबीचे दृतगती मार्ग, १४ हजार किलोमीटरहून अधिक लांबीचे राज्य आणि रस्ते मार्ग तसंच पर्यटन स्थळांना जोडणारे ४ हजार किलोमीटरहून अधिक लांबीचे रस्ते उभारणार असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद योजनेची घोषणाही त्यांनी केली. तसंच १ हजारापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांना कॉंक्रिटच्या रस्त्यांनी जोडण्याचा मानस त्यांनी जाहीर केला.

महात्मा ज्योतिबा फुले आणि संत गाडगेबाबा यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विविध उपक्रमांची घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज अर्थसंकल्पात केली.

**होल्ड - मुख्यमंत्री फुले गाडगेबाबा**

बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विविध योजना सरकार जाहीर करणार आहे. तसंच अजित पवार यांचं भव्य स्मारक उभारण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी आज केली. त्यांच्या नावे गतीमान नागरिक सेवा पुरस्कार जाहीर करणार असल्याचंही फडनवीस म्हणाले.

२०४७ पर्यंत उद्योग क्षेत्राचा जीडीपी १२३ अब्ज डॉलरवरुन १५०० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचं उद्दिष्ट राज्य सरकारनं ठेवलं आहे. राज्याला जागतिक उत्पादनाचे केंद्र बनवण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. उत्पादन क्षेत्राचा राज्याच्या स्थूल उत्पादनातला वाटा ३० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची सरकारची योजना आहे. यासाठी प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक जिल्ह्यात MSME केंद्र स्थापन केलं जाणार असून MSME आणि सेवा क्षेत्रासाठी आयुक्तालयाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात केली. राज्यात नवउपक्रम शहरांची उभारणी करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला. राज्यातल्या परदेशी पर्यटकांची संख्या १६

कोटींहून ३८ कोटीपर्यंत वाढवण्याचं सरकारचं उद्दिष्ट आहे. त्यासाठी मुंबई, सिंगापूर आणि दुबईत विशेष केंद्र स्थापन केली जाणार आहेत.

आकांक्षित जिल्हा आणि तालुका योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्यात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे आणि परभणी या जिल्ह्यांचा समावेश राज्य सरकारनं केला आहे. सध्या गडचिरोली, नंदूरबार, धाराशिव आणि वाशिम जिल्हे यात आहेत. या दहा जिल्ह्यातल्या ७७ तालुक्यांसह इतर जिल्ह्यात मिळून एकूण १०० तालुक्यांवर सरकार विशेष लक्ष देणार आहे. याशिवाय सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीच्या विकासावर केंद्रीत सिंधुरत्न योजनेचा दुसरा टप्पा सरकार सुरू करणार आहे. दिव्यांगासाठी राज्यात ३६ कौशल्य आणि उद्योजकता विकास केंद्र स्थापन केली जाणार आहेत.

नागपुरात महाराष्ट्र सार्वजनिक आरोग्य संस्था तर सातारा जिल्ह्यातल्या दरे गावात निसर्गोपचार केंद्र सुरू केलं जाणार आहे. कर्करोग, मधुमेह, हृदयविकाराची तपासणी करण्यासाठी ग्रामीण भागात दरवर्षी तपासणी शिबिर राबवण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. प्रदूषण करणारी जुनी वाहन विकून नवीन वाहन विकत घेणाऱ्या नागरिकांना मोटार वाहन करात ३० टक्क्यांपर्यंत सवलत देण्याची घोषणाही त्यांनी या अर्थसंकल्पात केली.

एकूण ७ लाख ६९ हजार ४६७ कोटी रुपयांचा अर्थसंकल्प देवेंद्र फडनवीस यांनी आज सादर केला. त्यात ६ लाख १६ हजार कोटी रुपयांहून अधिक महसुली जमा आणि ६ लाख ५६ हजारांहून अधिक महसुली खर्च अपेक्षित आहे. येत्या आर्थिक वर्षात राज्याची महसुली तूट ४० हजार ५५२ कोटी रुपये असेल. तर राजकोषीय तूट दीड लाख कोटींच्या वर जाईल, असा सरकारचा अंदाज आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल विविध राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात नवीन राज्यपालांची नियुक्ती केली. तेलंगणाचे राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी तर हिमाचल प्रदेशचे राज्यपाल शिव प्रताप शुक्ला यांची तेलंगणाचे राज्यपाल म्हणून नेमणूक झाली आहे. बिहारचे माजी सभापती नंद किशोर यादव हे नागालँडचे राज्यपाल म्हणून काम पाहतील. पश्चिम बंगालचे राज्यपाल डॉक्टर सी व्ही आनंद बोस यांचा राज्यपालपदाचा राजीनामा राष्ट्रपतींनी स्वीकारला आहे. तामिळनाडूचे राज्यपाल आर एन रवी आता पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणून तर केरलमचे राज्यपाल राजेंद्र आर्लेकर

तामिळनाडूचे राज्यपाल म्हणून पदभार स्वीकारतील. लद्दाखचे नायब राज्यपाल कविंदर गुप्ता यांच्याकडे हिमाचल प्रदेशचं राज्यपालपद सोपवण्यात आलं असून दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना आता लद्दाखचे नायब राज्यपाल म्हणून काम पाहतील. माजी राजनैतिक अधिकारी तरनजीत सिंह संधू यांची दिल्लीच्या नायब राज्यपालपदी नेमणूक झाली आहे.

<><><><>

मुंबई, ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यात आज उष्ण आणि दमट हवामान राहील, तर तुरळक ठिकाणी उष्णतेची लाट राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे. तर याच चार जिल्ह्यांमध्ये पुढचे दोन दिवस उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

<><><><>

टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारताने अंतिम फेरीत धडक मारली आहे. विश्वविजेते पदाची लढत रविवारी भारत आणि न्यूझीलंड यांच्यात होईल. अमदाबादमध्ये रविवारी हा सामना होणार आहे.

काल मुंबईत वानखेडे मैदानावर झालेल्या उपान्त्य फेरीच्या रोमहर्षक सामन्यात भारताने इंग्लंडचा सात धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करत भारतीय संघाने, संजू सॅमसनच्या ८९, शिवम दुबेच्या ४३ आणि ईशान किशनच्या ३९ धावांच्या बळावर सात बाद २५३ धावा केल्या. इंग्लंड संघाने जेकब बेथलच्या झंझावाती शतकी खेळीच्या जोरावर हे लक्ष्य गाठण्याचा प्रयत्न केला. मात्र इंग्लंडला २४७ धावांवर रोखण्यात भारतीय गोलंदाज यशस्वी ठरले. भारताचा सलामीवीर संजू सॅमसन सामनावीर ठरला. त्याचा समावेश मालिकावीरांच्या आयसीसीच्या संभाव्य यादीत झाला आहे. त्याच्याशिवाय इतर ७ जणांचा समावेश यात आहे.

<><><><>

शेती हा देशाच्या विकासाच्या दीर्घकालीन प्रवासासाठी एक धोरणात्मक आधारस्तंभ असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज कृषी आणि ग्रामीण परिवर्तन या विषयावरच्या अर्थसंकल्पोत्तर वेबिनारला संबोधित करत होते. कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी सरकारने सातत्याने पावलं उचलली आहेत. यंदाचा अर्थसंकल्प शेती आणि

ग्रामीण परिवर्तनाला प्रोत्साहन देत असल्याचं मोदी म्हणाले. देशात सध्या अन्नधान्य, डाळी आणि तेलबियांचं विक्रमी उत्पादन होत असून निर्यातीवर लक्ष केंद्रित करून रसायनमुक्त शेती आणि नैसर्गिक शेतीवर भर देण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली.

//<><><><><>//